क्रमांक : १०७२६ / ब कक्ष
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : ८ जुलै, २०२१

## :: परिपत्रक ::

**विषय :- महाराष्ट्र विधानसभेच्या सन २०२१ च्या द्वितीय (पावसाळी) अधिवेशनातील व्यपगत करण्यात आलेले प्रश्न अतारांकित स्वीकृत करण्यात आल्याबाबत**

**संदर्भ :- १) या सचिवालयाचे परिपत्रक क्र.८७००/ब कक्ष, दिनांक ८ जून, २०२१**
**२) या सचिवालयाचे परिपत्रक क्र.९७२०/ब कक्ष, दिनांक २५ जून, २०२१**

सर्व मंत्रालयीन विभागांना कळविण्यात येते की, विधानसभा कामकाज सल्लागार समितीची मंगळवार, दिनांक २२ जून, २०२१ रोजी झालेल्या बैठकीत सन २०२१ च्या द्वितीय (पावसाळी) अधिवेशनात प्रश्नोत्तरे घेण्यात येणार नसल्याचे तसेच स्वीकृत प्रश्न व्यपगत करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. यानुषंगाने या अधिवेशनासाठी विभागाकडे उत्तरासाठी पाठविण्यात आलेले तारांकित स्वीकृत प्रश्न व वस्तुस्थितीसाठी विभागाकडे पाठविण्यात आलेले प्रश्न व्यपगत करण्यात आले असल्याचे संदर्भ क्रमांक २ वरील परिपत्रकान्वये कळविण्यात आले होते.

तथापि, सोमवार, दिनांक ५ जुलै, २०२१ रोजी विधानसभा सभागृहात व्यपगत प्रश्न अतारांकित स्वीकृत करण्याबाबत उपस्थित केलेल्या मुद्याच्या अनुषंगाने मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी दिलेल्या निदेशानुसार या अधिवेशनाकरीता उत्तरासाठी विभागाकडे पाठविण्यात आलेले तारांकित स्वीकृत प्रश्न अतारांकित स्वीकृत करण्यात आले आहेत. या अतारांकित प्रश्नांची उत्तरे म.वि.स. नियम ७२ (२) अन्वये सदरहू परिपत्रक निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसाच्या आत या सचिवालयास पाठविण्यात यावीत. तसेच वस्तुस्थिती / वस्तुस्थिती व सदस्य खुलाशाचे विभागाकडे पाठविण्यात आलेले प्रश्न विधानसभा नियमातील तरतुदींच्या अनुषंगाने व्यपगत करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(विलास आठवले)
उप सचिव
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

प्रति ,

१) मा.मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव
२) मा.उप मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव
३) मा.मंत्री व मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
४) सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई
यांना माहितीसाठी तथा कार्यवाही अग्रेषित.